वीरगाथा प्रकल्प ४.०
निबंध लेखन – गट ६वी ते ८वी
राणी लक्ष्मीबाई माझ्या स्वप्नात आल्या.
त्यांनी मला आपल्या राष्ट्राची सेवा
करण्यास सांगितले...

काल रात्री मला एक आश्चर्यकारक स्वप्न पडले. झाशीच्या शूर राणी लक्ष्मीबाई माझ्याकडे आल्या आणि म्हणाल्या, "तुमच्या राष्ट्राची सेवा करा, हे तुमचे कर्तव्य आहे." त्यांचे वाक्य ऐकून मी उत्साहाने भारावून गेले. भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या राणी लक्ष्मीबाई या खऱ्या आदर्श राणी होत्या. त्यांनी आम्हाला दाखवून दिले की धैर्य आणि दृढनिश्चय असल्यास कठीण आव्हानांवरही मात करता येते. त्यांच्या बोलण्याने मला जाणवले की, मीही राष्ट्रसेवा करू शकते. आपल्या देशाची सेवा करण्याचा अर्थ असा नाही की, आपण युद्धे लढली पाहिजेत किंवा महान नेते व्हावेत. आपण अगदी छोट्या गोष्टींनीही सुरुवात करू शकतो. मला तर वाटते की, आपण लहानातून सुरुवात केली की मोठी ध्येये साधणे अवघड राहत नाही.

सभोवतालच्या व्यक्तींना पाहिले की, त्या व्यक्ती दुःखी, निराश वाटतात. परंतु पुढील छोट्या छोट्या कृती केल्यास त्या कृती आपल्याला आनंद देतात. आपल्या कुटुंबातील व्यक्तींना आणि मित्र-मैत्रिणींना नेहमी मदत करा. आपले घर, वर्ग, शाळा आणि परिसर नेहमी स्वच्छ ठेवा. परिसरातील झाडांची काळजी घ्या. पर्यावरणपूरक वस्तू वापरा. नियमित अभ्यास करा आणि नेहमी वडिलधाऱ्या व्यक्तींचा शिक्षकांचा आदर करा. एवढे केले तरी आपण स्वतः आनंदी तर राहूच आणि इतरांनाही आनंद देऊ शकतो.

झाशीच्या राणी लक्ष्मीबाईंच्या संदेशाने मला आठवण करून दिली की, केलेली प्रत्येक कृती मनापासून केल्यास त्याची इतिहासात नोंद घेतली जाते. आपण समा-

जसेवा करू शकतो, भूतदया करू शकतो, इतरांशी प्रेमळपणे वागू शकतो. त्यामुळे मला राणी लक्ष्मीबाई या सकारात्मक बदल करण्याची प्रेरणा देणाऱ्या महान स्त्री वाटतात.

राणी लक्ष्मीबाई यांच्यापासून प्रेरणा घेऊन मी खाली दिलेल्या गोष्टी नक्कीच करू शकते.

१. समाजाला मदत करणाऱ्या शालेय कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे.

२. झाडे लावून तसेच त्यांची निगा राखून पर्यावरणजतन करणे.

३. प्लास्टिकचा वापर टाळून कचरा कमी करणे.

४. आपल्या देशाच्या इतिहासाबद्दल आणि संस्कृतीबद्दल अधिक जाणून घेणे.

राणी लक्ष्मीबाईंच्या स्वप्नातील भेटीने मला शिकवले की, आपल्या देशाची सेवा करणे हे गौरवास्पद व अभिमानास्पद आहे. मी वचन देते की, मी जबाबदार नागरिक होणारच. आपल्या ध्वजाचा आणि राष्ट्रगीताचा आदर करणारच.

राणी लक्ष्मीबाईंचे शब्द अजूनही माझ्या मनात प्रतिध्वनीत होत आहेत, "तुमच्या देशाची सेवा करा, हे तुमचे कर्तव्य आहे." हे स्वप्न मी कायम लक्षात ठेवीन आणि बदल घडवण्याचा प्रयत्न करीन.